VOLUME - VIII, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2019
**AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)**

# CONTENTS OF MARATHI PART - I


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | स्त्रीवाद आणि बदलते संदर्भ<br>**प्रा. धारवाडकर दीपक सुधाकर** | १-४ |
| २ | स्त्रीकेंद्री मासिके स्त्रीमुक्ती चळवळीचे एक व्यासपीठ<br>**डॉ. विनोद संभाजी सोनवणे** | ५-११ |
| ३ | एकोणिसाव्या शतकातील मराठी भाषेतील वृत्तपत्रांचा उदय व कार्य<br>**प्रा. सचिन ज्ञानेश्वर मोरे** | १२-१६ |
| ४ | १९ व्या शतकातील कंपनी सरकार व ब्रिटीश शासन काळातील महाराष्ट्रातील शिक्षणप्रसार<br>**प्रा. राजेंद्र हिम्मतसिंग वळवी** | १७-२४ |
| ५ | १९ व्या शतकातील महाराष्ट्रील सामाजिक धार्मीक सुधारणा चळवळ<br>**प्रा. डॉ. दिगंबर जनार्दन सोनवणे** | २५-२८ |
| ६ | १९ व्या शतकातील महाराष्ट्रातील दलित चळवळीची वाटचाल<br>**प्रा. राजेंद्र रामभाऊ काळे** | २९-३३ |
| ७ | आधुनिकीकरण आणि शेतीविषयक परिवर्तन<br>**प्रा. लतिका हिरालाल पंडुरे** | ३४-३८ |
| ८ | १९ व्या शतकातील महाराष्ट्रातील परीवर्तन - ऐतिहासिक विश्लेषण<br>**सुभाष लक्ष्मण अहिरे** | ३९-४३ |
| ९ | न्या. महादेव गोविंद रानडे यांचे शैक्षणिक विचार<br>**डॉ. के. एम. अंबाडे** | ४४-४७ |
| १० | महाराष्ट्रातील आंबेडकरी चळवळ : ऐक्य अपरिहार्य<br>**डॉ. प्रकाश तुकाराम शिंदे** | ४८-५७ |
| ११ | महात्मा फुले यांचे शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातील योगदान<br>**प्रा. अनाप एस. ए.** | ५८-६० |
| १२ | आधुनिक महाराष्ट्रातील शिक्षणाच्या बहुजनीकरणातील दलित मित्र दादासाहेब पाटील व कर्जत तालुक्यातील रयत शिक्षण संस्थेची भुमिका<br>**प्रा. वटाणे के. आर.**<br>**प्रा. भैलुमे एच. पी.** | ६१-६४ |

VOLUME - VIII, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2019
AJANTA - ISSN 2277 - 5730 -IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

# १. स्त्रीवाद आणि बदलते संदर्भ

**प्रा. धारवाडकर दीपक सुधाकर**
समाजशास्त्र विभाग प्रमुख, तोष्णीवाल महाविद्यालय, सेनगांव, ता. सेनगांव जि. हिंगोली.

**प्रस्तावना**

स्त्रीवाद ही विचार प्रणाली 1975 नंतरच्या दशकात महाराष्ट्रात पुढे आली. पाश्चात्य प्रगत देशातील स्त्रियांचा सार्वजनिक जीवनात प्रवेश अधिक वेगाने झाला, म्हणून 1960 नंतर स्त्रीचळवळीची दुसरी लाट, पाश्चात्य जगात प्रथम निर्माण झाली. या स्त्री संघर्षातून 'स्त्रीवाद' ही विचार प्रणाली पुढे आली. स्त्रीयांच्या दुय्यमतेचा शोध घेताना मानवी इतिहास,संस्कृती,समाजव्यवस्था,नीती, व मानवी संबंधाकडे पाहण्याची नवी दृष्टी या विचारप्रणालीने दिली. 1975 च्या सुमारास आंतरराष्ट्रीय महिला वर्षाच्या संदर्भात आपल्याकडील स्त्रीयांचा असंतोष तीव्र स्वरूपात व्यक्त होउ लागला. आंतरराष्ट्रीय महीला वर्षाच्या निमीत्ताने भारतीय स्त्रीयांचा पाश्चात्य स्त्री–चळवळींशी व विचारांशी संपर्क आला. स्त्री–कार्यकर्त्यांची दृष्टी बदलत गेली.आपल्याकडील स्त्रीचळवळ 'स्त्रीवाद' जाणिवा घेऊन काम करू लागली. स्त्रीवाद दृष्टीकोणामुळे पुरूषी वर्चस्व स्त्रीचे दुय्यमत्व–स्त्रीचे समाजरचनेतील नाकारले गेलेले मनुष्यत्व–हे लक्षात येऊ लागले. निसर्गतः लिंगामुळे स्त्री व पुरूष हा जैविक भेद निर्माण होत असला तरी बाईपणा किंवा स्त्रीत्व आणि पूरूषत्व या संकल्पना मात्र समाजनिर्मीत आहेत. संपत्ती मालकी हक्क वारसा या क्रमात कुटुंबसंस्थेत, स्त्रीला ताब्यात ठेवण्यासाठी तिच्यावर संस्कार मर्यादा मुल्य दडपणुक लादून, पुरूषी वर्चस्व व स्त्रीचे दुयमत्व घडत गेले व स्त्रीला समाजरचनेंतील मनुष्यत्व नाकारले गेले हा क्रम स्त्री चळवळीतील अभ्यासकांनी प्रकाशात आणला. त्यामुळे स्त्रीला समाजरचनेतील माणूस म्हणून अर्थपूर्ण स्थान प्राप्त व्हावे. यासाठी जीवनाच्या सर्व क्षेत्रांत संघर्षशील राहणारी स्त्रीवाद ही विचारप्रणाली आपल्याकडील स्त्री चळवळीने स्वीकारलेली आहे.

**संशोधनाचे उद्देश**

1. स्त्रीवादी विचारसरणीचा अभ्यास करणे.
2. स्त्रीयांच्या दुय्यमतेच्या कारणांचा शोध घेणे.
3. स्त्रीला समाजरचनेत माणूस म्हणून अर्थपुर्ण स्थान प्रात्प व्हावे यावर प्रकाशझोत टाकणे.
4. स्त्रीयांच्या विविध पातळीवरील शोषणाच्या कारणाचा शोध घेणे.
5. स्त्रीवादी चळवळीवर प्रकाशझोत टाकणे.

**गृहितके**

1. स्त्रीला समाज रचनते माणुस म्हणून अर्थपूर्ण स्थान प्राप्त झाले नाही.
2. स्त्रीला प्राप्त झालेल्या दुय्यम स्थानामुळे स्त्रीचे विविध स्तरावर शोषण होते.
3. समाजात कामाच्या ठिकाणी स्त्रीयांचे शोषण व दडपणुक होते.
4. स्त्रीत्व–पुरूषत्व या संकल्पना समाजनिर्मीत आहेत.
5. स्त्री–पुरूष लैंगिक विषमतेचे बीज कुटुंबव्यवस्थेत आहे.

**संशोधन पध्दती**

प्रस्तुत संशोधनाकरीता व्यष्टी अध्ययन पध्दतीचा वापर करण्यात आला असुन भटक्या समाजाचे अध्ययन करण्याकरीता वैयक्तीक, प्राथमिक स्त्रोतांचा वापर करण्यात आला आहे. तसेच मासीके, वर्तमानपत्रे, पुस्तके, इंटरनेट या दुय्यम स्त्रोतांचा वापर करण्यात आला आहे.

**स्त्रीवाद म्हणजे काय**

स्त्रीयांच्या दुय्यमतेमुळे आपल्या समाजव्यवस्थेत स्त्रीयांचे होणारे शोषण विविध स्तरांवर अधोरेखीत करणे आणि त्या विरोधी कृतीच्या पातळीची दिशा ठरविणे, हे कार्य स्त्री–चळवळींनी चालविलेले दिसते. समाजात कामाच्या ठिकाणी कुटुंबात स्त्रीयांचा होणा–या शोषणाची दडपणुकीची जाणीव होते. व ही परिस्थीती बदलण्यासाठी स्त्रीया आणी पुरूष यांनी जाणीवपूर्वक कृती करणे अशी स्त्री कार्यकर्त्या स्त्रीवादी कृतीची व्याख्या करतात. स्त्री चळवळीशी संलग्न असणा–या स्त्री अभ्यासक पुरूषवर्चस्वासाठी स्त्रीविषयीची केलेली अभ्यासमूलक विचारसरणी, स्त्रीचे सर्वच स्तरांवर नाकारलेले मनुष्यत्व व स्त्रीला दिलेले कनिष्ठतव हे लैंगिक राजकारण उघड करताना दिसतात. स्त्रीविषयक अभावमूलक विचारसरणीला नकार देणे, स्त्री ही अपूर्ण मानव असल्याची समजूत नष्ठ करणे आणि स्त्रीविषयक नवीन मानदंड निर्माण करण्यासाठी व्यूव्ह रचने हे स्त्रीवादी राजकारण अवलंबवताना दिसतात. म्हणून ''समाजकारण,अर्थकारण,राजकारण, कला व वाडमय व्यवहार या सर्व क्षेत्रात स्त्रीयांच्या वाटयाला आलेल्या दुय्यम स्थान नाकारून माणूसपणाचा क्षमताधिष्ठीत हक्क प्राप्त करण्यासाठी केलेली राजकीय चळवळ अशी स्त्रीवादाची व्याख्या स्त्रीवाद अभ्यासक करतात.''

**स्त्रीवाद विचारप्रणाली**

निसर्गतच स्त्री पुरूष हा लिंगभेद असला तरी स्त्रीत्व किंवा पुरूषत्व या संकल्पना मात्र समाजनिर्मीत आहेत. याची मांडणी प्रागैतिहासापासून इतिहासाच्या अभ्यासातून गीता साने, आ.ह.साळुंखे यांनी केलेली दिसून येते प्रागेतिहासात स्त्री पुरूषांइतकीच स्वतंत्र होती. शेतीचा शोध स्त्रीने लावला. शेतीप्रधान मानवी समाजात स्त्रीयांचे स्वतंत्रस्थान नष्ठ होत गेले. मालकी हक्क वारसा क्षेत्रशुध्दी या टप्यात स्त्री सर्वस्वी मालमत्ता होउन एका पुरूषाच्या स्वामीत्वाखाली आल्यावर घरकाम करणारी,सेवा करणारी हे स्थान तिला प्राप्त होत गेले. पतिव्रत्य संगोपन मातृत्व ही मुल्य निर्माण होउन स्त्री ही पुरूषाची गुलाम बनली. कोणत्याही निर्णय प्रकियेत सत्तेत स्त्रीला वाटा राहीला नाही. स्त्री ही माणुस आहे. तिच्या ठायी बुध्दी सारासार विचार, भावना, धैर्य, करूणा, स्नेह इत्यादी मानवी गुण आहेत. यचाच समाजाला विसर पडला. परिस्थीतीच्या साच्यात ओतलेल्या स्त्रीचे व्यक्तीमत्व नष्ठ झाले. अशा स्वरूपाची स्त्रीवादी दृष्टीकोणातून इतिहासाची मांडणी गीता साने करताना दिसतात. आ.ह. साळुंखे त्यांच्या हिंदु संस्कृती आणि स्त्री या ग्रंथात धर्मग्रंथातील पुरूषसत्ताक दुटप्पीपणा उघड करताना दिसतात. गार्गी मैत्रेयी या वेदकालीन ब्रहावादीनीच्या उदाहरणातुन ते भारतीय स्त्रीयांच्या सन्मानाचा इतिहास, प्रतिनिधीक नसून अपवादात्मक कसा आहे हे दाखवून देतात. स्त्रीयांना गुरूगृही शिकण्याचा नसणारा अधिकार, स्त्रीयांच्या गृहविषयक कामातच पंडीत होण्याची अपेक्षा पती म्हणजे पालक मानने पती चरित्रहीण , लंपट असला तरी त्याची पत्नीने देवाप्रमाणे सेवा करावी हे गृहीतत्व हे सगळे सांगणा–या हिंदुधर्मग्रंथातील दुटप्पीपणा त्यांनी उघड केला आहे.

1950 ते 1975 या काळात महाराष्ट्रातील औद्योगिकीकरणामुळे, स्त्रीयांच्या सामाजिक आर्थिक सहभागाला अनुकूल वातावरण निर्माण झाले व स्त्रीविकासाचे काही टप्पे सोपे झाले. परंतु त्यापेक्षा अधिक वेगाने बदल 1975 ते 1995 या वीस वर्षात झाले. स्त्री चळवळीने मांडलेले काही प्रश्न आणि मुद्दे समाजाला मान्य होत गेले. त्यामुळे स्त्री

चळवळीतुन पुढे येणारा स्त्रीवाद अभ्यासणे व त्यासाठी स्त्री चळवळींशी प्रत्यक्ष संलग्न असणा–या कार्यकर्त्या आणि विचारवंत या नात्याने छाया दातार , विद्या बाळ, निलम गो–हे, विद्युत भागवत यांचे आपल्या समाज संस्कृतीच्या संदर्भातील स्त्रीवादी विचार लक्षात घेणे योग्य ठरते.

**पतीच्या संदर्भात नियंत्रित झालेले पतीचे अस्तीत्व**

आपल्या समाजात उच्चवर्गीय स्त्रीया व कनिष्ठ वर्गीय स्त्रीया त्यात्या वर्गातील पुरूषांपेक्षा दुय्यमच असतात व त्यांचे शोषण होत असते. तरीही धर्म जाती वर्ग भेदापेक्षा एक वेगळाच भेद आपल्याकडे स्त्रीयांमध्ये निर्माण केलाजातो. छाया दातारांना श्रमजीवी कनिष्ठ वर्गातील स्त्रीयांमध्ये सती किंवा सौभाग्यवती, रांड, उंडगी, चवचाल,बाजारबसवी, कुवार वगैरे निर्माण केलेल्या जाती दिसतात. स्त्रीचे पुरुषांशी संबंध कोणत्या प्रकारचे आहेत. यावरून या जाती निश्चित होतात. विद्या बाळ यांनी मध्यमवर्गात स्त्रीची प्रतिष्ठा वैवाहीक दर्जाशीच जोडलेली दिसते. विधवा, परित्यक्ता, घटस्फोटीता, अविवाहीता या नवरा नसणा–या स्त्रीयांना एकटी, अशुभ, अशकुणी ठरविली जाते. आजदेखील समाज याच नजरेणे त्यांच्याकडे पाहतो. स्त्रीयामध्ये भेद करणारे हे निकष बदलुन एकमेंकींच्या सह अनुभूतीवर आधारलेला भगिनीभाव निर्माण होण्याची गरज स्त्रीवादी प्रतिपादन करतात.

**जननक्षमता, लैगिकता, उत्पादनक्षमता या जीवनव्यवहारातील स्त्रीचे दुयम स्थान**

आजच्याकाळातही स्त्रियांचे जननक्षमता, लैगिकता व उत्पानक्षमता या तिनही व्यवहारामध्ये दुय्यम स्थान असुन त्यांवर पुरूषांचे नियंत्रण असते. हे स्त्रीवादी मांडतात मुलगाच जन्माल घालण्याची सक्ती, संततीनियमनाचा निर्णयं घेण्याचा नव–याला असणारा अधिकार गर्भजल परीक्षा करून मुलीच्या गर्भाचा दिला जाणारा बळी, गर्भनिरोधक लसींचे व गर्भनिरोधक साधनांचे स्त्रीयावर केले जाणारे प्रयोग यांचा निर्देश करून स्त्रियांच्या जननक्षमतेवर पुरूषांचा ताबा कसा आहे. हे स्त्रीवादी दाखवुन देतात. स्त्रीयांच्या शरीरावर प्रयोग केले जाताना त्यांचे परिणामही विचारात घेतले जात नाहीत. लोकसंख्यावाढीसाठी पुरूषही कारणीभुत असताना त्यांच्या शरीरावर विशेष प्रयोग केले जात नाहीत. या दुहेरी मुल्यव्यवस्थेच्या वास्तवाला विद्या बाळ उघड करतातना दिसतात. जीवनोपयोगी शिक्षणाची आवश्यकता आणि जमातीकडून न्याय वा धर्माधिष्ठीत न्याय ही न्यायव्यवस्था नको तरसमान नागरीक न्यासव्यवस्था यांची मागणी करून स्त्रीयांच्या मानवी हक्कांवर येणारी गदा रोखण्याचे आवाहन स्त्रीवादी कृतीशील अभ्यासक रझीया पटेल करतात.

**विवाहसंस्था व कुटुंबसंस्था यांतील दुयमत्व**

स्त्रीयांच्या जननक्षमतेवर, लैंगिकतेवर, उत्पादनक्षमतेवर पुरूषांचे नियंत्रण, स्त्रीचे दुय्यम स्थान हे विवाह आणि कुटुंब यातील दुय्यम स्थानावरून निर्माण होते. त्याचीच परीणीती होउन सार्वजनिक निर्णयप्रकियेत अत्यल्प स्थान मिळते. वास्तविक जननकिया सोडली तर स्त्री आणि पुरूष यांच्या नैसर्गीक घडणीमध्ये दुसरा कोणताही फरक नाही. ही गोष्ट आता विज्ञानाने सिध्द झाली आहे. स्त्री –पुरूष यांच्यात इतर सर्व भेदाभेद इतिहास कमात मानवी समाजाने निर्माण केले आहेत त्यामुळे तत्वतः लिंगभेदावर आधारीत श्रमविभागणी ही आपल्याकडील कुटुंबसंस्था आणि लग्नसंस्था यांचा आत्मा आहे. विवाह हा मुलीच्या दृष्टीने एकमेव अत्यंत महत्वाचा संस्कार आजही मानला जातो. विवाह स्त्री –पुरूष दोघांचा असतो. परंतु विवाहाची गरज ही फक्त स्त्रीलाच आहे. हे तिच्या मनावर बिंबविले जाते. लैंगिकतेवर श्रमविभागणी नैसर्गिक मानली जाणे स्त्रीयांच्या हातात संपत्तीचा अधिकार नसणे बाप भाÅ किंवा नवरा यांच्या माध्यमातुन मिळणारा सांपतिक दर्जा या सगळयांची स्त्रीची अवस्था कुटुंबापासुन ते सार्वजनिक जीवनापर्यंत दुर्बल असुरक्षित बनविली जाते हे दिसुन येते.

**कुटुंबसंस्था व समाजव्यवस्थेतील परिवर्तनाची दिशा**

स्त्री पुरूष लैगिक विषमतेचे बीज कुटुंबव्यवस्थेत मुख्यत्वाने असते. व ते संस्कारातुन अधिष्ठीत होते. असे दिसत असल्यामुळे बदलत्या काळात संस्काराच्या परिवर्तनाचा विचार विद्या बाळ करतात. पती पत्नी दोघेही नोकरी करती असल्यामुळे पुरूषानेही घरकामाचा वाटा उचलणे, एकतर्फी प्रेमातुन वाढत जाणारे हिंसाचार टाळण्यासाठी प्रेमाची निकोप भावना रूजविणे बाई आणि पुरूष दोघेही माणसे आहेत. केवळ शारीरिक आणि अन्य अधिकाराच्या बळावर पुरूषाने बाईचा अपमान करणे तिला दुय्यम मानणे हे नैसर्गिक नसल्याची मनोधारणा घडविणे, बाई रडली नाही तर निष्प्रेम कठोर आणि पुरूष रडला तर बायकी .यांसारख्या बायकीपणा आणि पुरूषीपणाच्या पारंपारीक प्रतिमा नाकारून दोघांच्या मुळात 'माणुस' असण्याकडे पाहणे यासारख्या संस्कारांच्या जाणीवपुर्वकतेवर विद्या बाळ भर देताना दिसतात.

'स्त्रीमुक्ती', 'स्त्रीवाद' ही मनोवृत्ती आहे. स्त्रीचे मनुष्यत्व माणुन स्त्री–पुरूष समानता मानणारी स्त्रीचे व्यक्तीत्व पुरूषाइतकेच महत्वपूर्ण मानणारी ही मनोवृत्ती आहे. तिला भारतीय पंरपरेत पर्यायी संज्ञा अस्तीत्वात नव्हत्या तरी स्त्रीवाद स्वरूपाच्या विचाराला काही अंशाने का होईना आधार आहे. वेदकाळात , बुध्दपंथात, महानुभव वारकरी, लिंगायत पंथात स्त्रीयांना दिलेले अधिकार आणि त्यांनी बजावलेली महत्वाची कामगीरी यांचा शोध घेतला गेलेला दिसतो.

**निष्कर्ष**

1. स्त्री–पुरूष हा भेद न करता सह अनुभूतीवर आधारित बंधुभाव निर्माण होणे गरजेचे आहे.
2. स्त्रीयांच्या हक्कावर येणारी गदा रोखणे हे स्त्रीवादी चळवळीचे अंतिम ध्येय आहे.
3. लैंगिकतेवर श्रमविभागणी नैसर्गिक आहे.
4. स्त्रीमुक्ती,स्त्रीवाद ही मनोवृत्ती आहे.
5. स्त्री–पुरूष समानता माननारी स्त्रीचे व्यक्तीत्व पुरूषा इतकेच महत्वपूर्ण माननारी मनोवृत्ती असून तिला भारतीय पंरपरेत पर्यायी संज्ञा अस्तीत्वात नव्हत्या.

**संदर्भ ग्रंथ**

1. कीर धनंजय (संपा) म.फूले समग्र वाङःमय, म.रा. साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई 1969
2. गोन्हे नीलम – नारीपर्व, श्री विद्या प्रकाशन,पूणे 1997
3. बाळ विद्या – संवाद, रोहन प्रकाशन, पूणे 1992
4. डॉ. भागवत विद्युत – स्त्रीयांचा कर्तेपणाचा इतिहास(19वे शतक) स्त्री अभ्यासकेंद्र, पूणे विद्यापीठ
5. भागवत कमल – स्त्री चळवळीची वाटचाल, प्रागतिक प्रकाशन,पुणे 1985
6. Moi Toril (Ed) – Sexuali Texual : Politics Fenrinist Academic and Educational London 1986
7. Poonach Veena – Gender within the Human Rights Discourse, Research centere for women studies SNDT Women University Bombay 1995
8. भारतीय समाज समकालीन समस्या – प्रा.दीपक धारवाडकर / प्रा.साहेबराव भालेराव ,रूद्राणी पब्लीकेशन हाउस, भोकर 2017

# CONTACT FOR SUBSCRIPTION


**AJANTA ISO 9001: 2008 QMS/ISBN/ISSN**

**Vinay S. Hatole**

**Jaisingpura, Near University Gate, Aurangabad (M.S) 431 004,**

**Cell : 9579260877, 9822620877 Ph: 0240 - 2400877**

**E-mail : ajanta1977@gmail.com Website : www.ajantaprakashan.com**




MAH/MUL/ 03051/2012 ISSN :2319 9318

आंतरविद्याशाखीय बहुभाषिक शोध पत्रिका

विद्यावार्ता™

Special Issue – Vol. I

# VIMUKTA - NOMADIC CASTES – TRIBES AND OTHER BACKSWORD CLASS: PRESENT CONDITIONS, DEVELOPMENT AND CHALLENGES.

**Guest Editor**

**Dr.R.D.Rathod**

**Dr.B.K.Shep**

**Dr.K.M.Bhange**

"Printed by: **Harshwardhan Publication Pvt.Ltd.** Published by **Ghodke Archana Rajendra** & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor **Dr. Gholap Bapu Ganpat**.

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205

Harshwardhan Publication Pvt.Ltd.

At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed

Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295

harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com

All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

77) भटक्या विमुक्त जाती मधील वडार समाजातील स्त्रीयांच्या कौटुंबिक व सामाजिक समस्याचा अभ्यास ||188
सोनवणे अमोल गणेशराव, परभणी

78) भारतातील हरितक्रांती — एक अभ्यास ||191
प्रा. संजय रणखांबे & प्रा. आदिनाथ नागरगोजे, परळी वै.

79) हरीतक्रांतीचे प्रणेते - वसंतराव नाईक आणि महाराष्ट्राची जडणघडण ||193
डॉ. विनोद बाबुराव बोरसे, जि. औरंगाबाद


80) हरितक्रांतीचे प्रणेते वसंतराव नाईक यांचे जिवन कार्य ||195
प्रा.चाटे नारायण संभाजीराव & प्रा.गायकवाड राहुल मारोतीराव, ता.परळी.जि.बीड

81) हरितक्रांतीचे प्रणेते वसंतराव नाईक : जीवन आणि कार्य ||197
बोकडे भगवंत चंद्रकांत, लातूर

82) महाराष्ट्राच्या विकासात वसंतराव नाईक यांचे योगदान ||199
नागनाथ दाजिबा साळुंके, जि. बीड

83) भटक्या विमुक्त जमाती : कारणे आणि परिणाम ||201
प्रा. धारवाडकर दीपक सुधाकर सेनगांव जि.हिंगोली

84) हरित क्रांतीचे प्रणेते वसंतराव नाईक ||203
प्रा.डॉ. कालिदास दिनकर फड, करमाड ता.जि.औरंगाबाद




www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com

MAH MUL/03051/2012
ISSN: 2319 9318
Vidyawarta®
Peer-Reviewed International Publication
February 2019
Special Issue-01


83

# भटक्या विमुक्त जमाती : कारणे आणि परिणाम

**प्रा. धारवाडकर दीपक सुधाकर**
समाजशास्त्र विभाग प्रमुख
तोष्णीवाल महाविद्यालय, सेनगांव ता.सेनगांव जि.हिंगोली

**********

**प्रस्तावनाः—**

अनादी काळात टोळी जीवनाने राहणारा मानव अस्थिर जीवन जगत होता. उदरभरणाचे कोणतेही निश्चित साधन नसल्याने त्याला कायम भटकंती करावी लागे. संघर्षाच्या काळात दुर्बळ टोळीचे हे जीवन बनले. पुढे कालौघात मानवाला चरिर्थाची साधने ज्ञान होत गेली तसे जीवन स्थिर झाले. ज्यांना यात अपयश आले, आपले जीवन निश्चित करणे अशक्य झाले ते भटकतच राहीले. या लोकांना आजही कायम स्वरूपी चरितार्थाची साधने उपलब्ध नाहीत. परिणामी त्यांचे जीवन मागासलेले, अस्थिर, दारिद्री व दुर्लक्षित असे झाले आहे. या परिस्थितीत आजच्या घडीला फासरा फरक नाही. भटकणे हाच त्यांचा स्थायी भाव आहे.

अस्पृश्य व वनवासी समाजाकडे जनजागरण व कल्याण कार्यक्रम राबविणा—यांचे लक्ष वेधले जावून त्यांच्या उध्दारासाठी अनेक पातळीवर प्रयत्न झाले. या सर्व परिस्थीतीत भटका समाज मात्र उपेक्षित राहत गेला. त्याचे जीवनमान उंचावण्यासाठी फारसे संघटीत प्रयत्न आतापर्यंत झाले नव्हते कारण हा समाज कोठेच एका ठिकाणी स्थीर नव्हता. त्यांची संख्या अगदी काटेकोरपणे मिळत नाही. भटके (छवउंकपबे) या शब्दाची उत्पत्ती नेमो (छमउवक) या ग्रीक शब्दात शोधता येते. त्याचा अर्थ 'चारणे' विविध जनावरांना घेवून जेथे चारा उपलब्ध होईल तेथे नेण्याच्या प्रवश्त्तीतुन एक समाज तयार झाला. या निमित्ताने हिंडणारा व पुढे आपल्याही उपजिवीकेसाठी भटकणारा तो भटका समाज ( Nomadic) बनला.

**व्याख्या :**

कोणत्याही एका ठिकाणी स्थायी स्वरूपाची वस्ती न करता उपजिवीकेसाठी सतत आणि वरचेवर स्थलांतर करणा—या जमाती म्हणजे भटक्या जमाती होय.

रॉयल ॲंथ्रापॉलाजीक इन्स्टियूट ऑफ ग्रेट ब्रिटनः कोणतेही निश्चित निवासस्थान नसलेल्या व शिकार अथवा अन्न गोळा करत हिंडणे हेच प्रमुख जीवन असून त्यावरच ते अवलंबून असतात अशा लोकांचा समाज हा भटका समाज असतो.

**संशोधन विशयाचे उद्देश :**

1. भटक्या समाजाचे अध्ययन करणे.
2. भटक्या जमाती संबंधींच्या वर्गीकरणाचे अध्ययन करणे.
3. महाराश्ट्रातील भटक्या जमातीवर प्रकाशझोत टाकणे.
4. भटक्या समाजाचे जीवनमान उंचावण्यासाठी संघटीत, कायदेशीरपणे प्रयत्न करणे.

**सं□ोधन विशयाची गृहितके :**

1. भटका समाज असंघटीत आहे.
2. भटक्या समाजाचे पुन्हा नव्याने वर्गीकरण करणे गरजेचे आहे.
3. भटक्या समाजातील लोकांचे जीवनमान निम्मस्वरूपाचे आहे.
4. भटक्या समाजाचे जीवनमान उंचावण्यासाठी करण्यात येणारे प्रयत्न अपुरे आहेत.

**संशोधन पध्दतीः**

प्रस्तुत संशोधनाकरीता व्यष्टी अध्ययन पध्दतीचा वापर करण्यात आला असुन भटक्या समाजाचे अध्ययन करण्याकरीता वैयक्तीक, प्राथमिक स्त्रोतांचा वापर करण्यात आला आहे. तसेच मासीके, वर्तमानपत्रे, पुस्तके, इंटरनेट या दुय्यम स्त्रोतांचा वापर करण्यात आला आहे.

**भटक्या जमातीचे वर्गीकरणः—**

काळानुसार ज्या जमाती इतर समाजसाठी कष्ठ करत गेल्या. त्याही भटकतच राहिल्या. काही जमाती शेती करू लागल्या पण त्या जमीनीतील कस कमी झाला. पीक मिळेनासे झाले, आर्थिक कमकुवत पणामुळे त्या जमाती दुसरीकडे स्थलांतरीत होत गेल्या. अशा आर्थिक जीवन जगणा—या जमीतीचे पुढील प्रमाणे वर्गीकरण केले जाते.

1) अन्न गोळा करीत हिंडणा—या जमाती
2) प्राणी पाळणा—या जमाती
3) छोटे व्यवसाय करणा—या जमाती
4) भिक्षा मागणा—या जमाती
5) गावगाडयाला आवश्यक असणा—या जमाती
6) लोकांच्या दयेवर जगणा—या जमाती

यापैकी स्थूल मानाने पुढील काळात तीन प्रकारच्या जमाती मानल्या गेल्या.

1) गावगाडयाला आवश्यक जमाती
2) करमणूक करणा—या जमाती
3) लोकांच्या दयेवर जगणा—या जमाती

**1) गावगाडयाला आवश्यक जमाती :**

काही जमाती गावातील इतर जाती जमातींसाठी कामे करतात. गावात मंदिराचे काम निघाले की बेलदार त्या गावात मुक्काम करतो. ते काम पुर्ण झाले की, पुढच्या गावाला निघतो. शेती व घराला उपयोगी वस्तू विळा, कोयता, कडीकोयंडा, तयार करणारा घिसडी गावोगावी भटकतो. घराच्या बांधकामासाठी वडार समाज सगळीकडे फिरतो. जडीबुटी देणारा वैदूही एका ठिकाणी

राहत नाही. कळाच्या टोपल्या तयार करून विकणारा कैकाडी दहा गावात फिरून आपले पोट भरतो. असे गावाला उपयुक्त असणारे व्यवसाय करणारा मात्र सतत भटकंती करून कसेबसे आपले पोट भरतो. त्याला कोठेही एका ठिकाणी भरपूर अन्न मिळत नाही.

**2) करमणूक करणा—या जमाती :**

पूर्वी खेडेपाडी करमणूकीची साधने नव्हती. साहजीकच काही जमातींचे लोक आपल्या अंगचे कौशल्य दाखवून त्यावर आपले पोट भरीत असत. पुढे हाच त्यांचा दिनक्रम, जीवनक्रम बनला. आजही त्यात फारसा फरक नाही. या जमाती गावोगावी जातात आणि अन्न मिळवितात. नंदीबैलवाला गुबुगुबु करीत आबालवृध्दांची करमणूक करतो. लोक बैलाला नंदीचा अवतार समजून त्याची पुजा करतात. थोडेबहुत धान्य देतात. त्यावर दोघांची कशीबशी गुजारण होते. गारूडी, माकडवाला, अस्वलवाला, डोंबारी हे याच पठडीतील होते. कोल्हाटी, डोंबारी आपला जीव धोक्यात घालुन लोकांचे मनोरंजन करतात. अशा कित्येक जमाती आजही आपणास पहावयास मिळतात.

**3) लोकांच्या दयेवर जगणा—या जमाती :**

जोगी लोक भिक्षा मागून आपले जीवन जगातात. गोसावी जमातही यात मोडते. लोकांना दया येवून त्यांनी घातलेल्या भिक्षेवर या जमाती आपले जीवन जगत असतात. समासुदीला, लग्न समारंभाला दिलेल्या वाढणावर एक एक दिवस कसाबसा ढकलतात. निव्वळ पोट भरणे एवढीच या जामतींची अपेक्षा असते.

महाराष्ट्र शासनाने या सर्व जमातींच्या पाहणी अंती भटक्या व विमुक्त जमातींची वर्गवार यादी केली असून ती खालील प्रमाणे आहे.

**भटक्या जमाती (Nomadic Tribè):**

बालबैरागी, बेलदार, भराडी, भूते, चलवादी, चित्रकथी, घिसडी, गोपाळ, हेळवे, जोशी, काशीकापडी, कोल्हाटी, नंदीवाले, रावळ, सिकलवार, ठकार, वासुदेव, पांगुळ, भोई, ठेलारी, ओतारी इत्यादींचा समावेश यात होतो.

विमुक्त जमाती :

बारद, बेस्तर, भामटा, कैकाडी, कंजारभाट, बंजारा, लमाण, फासेपारधी, राजपूत भामटा, वाघरी, रामोशी, पाथरवट, राजपारधी इत्यादींचा समावेश यात होतो.

अलीकडच्या काळात करण्यात आलेल्या सर्वेक्षणानुसार भारतात एकूण 10कोटी भटक्या जमातीचे लोक असून त्यापैकी जवळपास 10 लक्ष लोक महाराष्ट्रात राहतात. भारतामध्ये एकूण 315 भटक्या जमाती तर 198 विमुक्त जमाती आढळतात. 1961 मध्ये महाराष्ट्र शासनाने जाहीर केलेल्या यादीत 24 भटक्या जामती तर 13 विमुक्त जमाती आढळतात. आज महाराष्ट्रात विमुक्त जमातींची संख्या 50च्या जवळपास आहे. अर्थात ही संख्या काटेकोरपणे सांगता येत नाही कारण ते आजही कोणत्याही एका ठिकाणी स्थीर नाहीत.

उपाय योजना :(त्मउमकपमेद्व

अलिकडे मात्र गेल्या चार पाच दशकात या वर्गातील काही जागरूक व्यक्ती नवजीवन जगण्यासाठी झटत आहेत. त्यातून आपल्यावरील अन्यायाचे व दुलर्क्षित वस्तीचे उच्चाटन करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. राज्याच्या घटनेतील तरतुदींचा व समाजातील इतरेजनांचाही पाठींबा त्यांना मिळत आहे. आज या वर्गाकडे सर्वांचे लक्ष वेधल्या गेले आहे. भटक्या विमुक्त जमातींना योग्य तो न्याय मिळावा, किमान सर्वसामान्य जीवन जगता यावे यासाठी खालील उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत.

1. घटनेच्या कलम 340 नुसार :—सर्वप्रथम भटक्या विमुक्त जमातीच्या लोकसंख्येची गणना करण्यात यावी. जनगणनेसाठी फिरते पथक नेमूण पाहाणी करण्यात यावी. कारण जोपर्यंत ही संख्या निश्चित होत नाही तोपर्यंत योजनाबध्द कार्यही करता येणार नाही.
2. भटक्या विमुक्तांचा जो वेगवेगळ्या प्रांतात वेगवेगळया सुचीमध्ये समावेश केला आहे तो काढून संपूर्ण भारतातील सर्व समाजींचा एकाच सूचीत समावेश केला जावा. जेणेकरून त्या संघटीत होतील.
3. राजकारणात सर्वत्र या जमातीच्या प्रतिनिधींना स्थान देण्यात यावे. म्हणजे त्यांचे प्रश्न शासनापुढे मांडता येतील व ते सोडविण्यासाठी प्रामाणिकपणे प्रयत्न केले जातील.
4. भटक्या विमुक्त जमातींची माहिती विशिष्ठ अभ्यासगट निर्माण करून प्रसिध्द करण्यात यावी.
5. देशात हजारो एकर पडून असलेली जमीन या जमातीच्या लोकांना देवून त्या जागीच त्यांचे पुनर्वसन करावे.
6. अनुसुचित जाती जमाती प्रमाणेच या जमातीच्या कल्याणार्थ आर्थिक योजनेत तरतुद करावी व योग्य प्रकारे अंमलबजावणी करावी.
7. ज्या जमातीकडे व्यावसायिक कौशल्य आहे त्यानुसार त्यांना व्यावसायिक प्रशिक्षण देवून रोजगाराच्या संधी निर्माण कराव्यात.
8. पाश्चात्य देशात भटक्या जमातीचे पुनर्वसन करण्यात आलेले आहेत. त्यांचा अभ्यास करून योग्य ती उपाययोजना करावी.
9. शरीराने सुदृढ व काटक असणा—या जमातीच्या तरूणांना सैन्यात भरती करून नोकरीची संधी उपलब्ध करून द्यावी.
10. प्रौढ शिक्षणाच्या कार्यक्रमात या लोकांना सहभागी करून घेण्यात यावे.
11. भटक्या जमातीचे पुनर्वसनाचे केंद्र इतर समाजाशेजारीच असावे. म्हणजे नागरी जीवनाशी त्यांचा संपर्क येवून ते योग्य ते परीवर्तन शक्य होईल. त्यासंबंधी योग्य ती कायदेशीर तरतुद करावी.

12. भटक्या जमातीच्या लोकांना कायम निवासस्थानाची सोय करावी कारण हे एकाच ठिकाणी राहत नसल्यामुळे त्यांना बँकेचा कर्जपुरवठा व शासनाच्या निवास योजनेचा लाभ घेता येत नाही. त्यामुळे ते रोजगार मिळवू शकत नाहीत. दारिद्रयामुळे ते एकाच ठिकाणी निवासही करू शकत नाहीत. त्यामुळे शासनामार्फत ही व्यवस्था करण्यात यावी.
13. कायद्यानुसार भटक्या जमातींना सर्व प्रकारचे संरक्षण देण्यात यावे.

वरील सर्व उपाययोजनांबरोबरच भारतीय राज्यघटनेत कलम 14 ते 16, 29,30,325,326 आणि 338 व 339 नुसार अनेक तरतुदी करण्यात येवून भटक्या जमातींच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक व राजकीय उत्कर्ष व्हावा याकरीता प्रयत्न करण्यात आले आहेत.

निष्कर्ष :

1. वर्तमान काळात देखील भटका समाज असंघटीत आहे.
2. असंघटीत असल्यामुळे या समाजाच्या समस्या इतर समाजापेक्षा वेगळया आहेत.
3. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर सुध्दा भटक्या समाजाच्या जीवनमानात फारशी सुधारणा झालेली नाही.
4. भटक्या समजाची नव्याने जनगणना करणे गरजेचे आहे.
5. भटक्या समाजाला त्याचे अधिकार आणि घटनात्मक तरतूदी विषयी फारशी माहिती नाही.

संदर्भ सुची :

1- Indian Constituition
www.hrw.org.http:alserviceindia.com.
2. भटक्या विमुक्तांची जात पंचायत चव्हान रामनाथ देशमुख आणि कंपनी प्रा. पूणे 2002
3. विमुक्तायन माने लक्ष्मण यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठाण 1997
4- States of Minority – Dr.B.R. Ambedkar
5. आधुनिक भारत मे सामाजिक समस्याऐं – डॉ. महेशकुमार परदेशी /दीपक धारवाडकर इशिका पब्लीकेशन हाउस, जयपूर 2016
6. भारतीय समाज समकालीन समस्या : प्रा. दीपक धारवाडकर / प्रा. साहेबराव भालेराव – रूद्राणी पब्लीकेशन हाउस, भोकर 2017